


## साबिर आणि भाजप यांच्यावर तुटून पडला सोशल मीडिया

प्रमोद मुतालिकांनंतर आता साबिर अली. असे वाटते, की भाजपने यू टर्न घेणे अंगवळणी पाडले आहे, केजरीवाल स्कूल ऑफ ड्रायव्हिंगमधून.
**-रोफी इंडियन**

साबिर अली यांनी श्रीराम सेनेचे प्रमोद मुतालिक यांची फ्रेंड रिक्वेस्ट फेसबुकवर आताच स्वीकारली आहे.
**-अमरेश मिश्रा**

साबिर अलींसाठी... चौबे गेले होते, छब्बे बनायला. दुबे बनून परतले. दुविधेमुळे दोघेही गेले, माया भेटली ना राम।
**-प्रो. एन. के. पांडे**

**पीपल** चांदणी चौक मतदारसंघात डॉ. हर्षवर्धन, कपिल सिब्बल आणि आशुतोष असा त्रिकोणी संघर्ष

# सर्वात लहान मतदारसंघात 3 दिग्गज

चांदणी चौक दिल्ली | आकार पाहता हा देशातील सर्वात लहान लोकसभा मतदारसंघ. मात्र, व्यावसायिकांच्या लोकसंख्या अधिक म्हणून सर्वात मोठा. यावेळी येथे प्रतिष्ठेची तिरंगी लढत होत आहे. अशा या ऐतिहासिक मतदारसंघातील लढतीबाबत पंकज पांडेय यांनी उमेदवारांशी केलेली दिलखुलास चर्चा...

### डॉ. हर्षवर्धन

## नंबर वन मीच, दोन का तीन काँग्रेस-'आप'ने ठरवावे!



**एका बाजूला कपिल सिब्बल आहेत, तर दुसरीकडे आक्रमक पत्रकार आशुतोष. तुमचे कोणते औषध काम करेल?**
मी प्रामाणिकपणा आणि चारित्र्याचे औषध घेऊन मैदानात उतरलो आहे. हा भ्रष्टाचार व अराजकता दूर करेल.

**तुम्ही मोदी नावाच्या आश्रयाला असल्याचे बोलले जाते.**
**निवडणूक** मोदी किंवा हर्षवर्धन यापैकी कोणाच्याही नावाने होत नाहीये. मात्र, मोदी आज लोकांच्या अपेक्षांचे प्रतीक बनले आहे, हे खरे आहे. लोकांना आपल्या भविष्यातील उमेद मोदींच्या नेतृत्वात दिसत आहे. त्यामुळे त्यांचे नाव आघाडीवर असणारच.

> मोदींचा रथ तर आता साक्षात् ईश्वरदेखील रोखू शकत नाही.
> *१९ मार्च २०१४ ला नवी दिल्लीत.*

**या मतदारसंघात भाजपमध्ये अंतर्गत ओढाताणही आहे. तरी तुम्ही विजयाचा दावा करत आहात?**
काँग्रेस व आम आदमी पार्टी भ्रष्टाचार व अराजकतेचे प्रतीक बनलेले आहेत. लोकांना सर्व काही माहीत आहे. लोकांना भाजप एक चांगला पर्याय वाटतो.

**राजकारणात प्रथम क्रमांकाचा शत्रू कोण आहे, काँग्रेस की आप?**
कोणाशी वैयक्तिक लढाई नाही. माझा कोणी प्रथम क्रमांकाचा शत्रू नाही. मी नंबर एकवर आहे, हे माहीत आहे. इतर दोघांना दोन आणि तीन क्रमांकासाठी लढाई करायची आहे. दोन्ही पक्ष एकमेकांची ए आणि बी टीम आहे. त्यांना दोन किंवा तीनपैकी कोणताही नंबर मिळो, फरक पडणार नाही.

**तुम्ही दिल्लीत मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार होते, लोकसभा लढवत आहात. म्हणजे तुम्ही दिल्लीचे राजकारण सोडले?**
असा काही निर्णय झालेला नाही. आता दिल्लीचा चॅप्टर क्लोज आहे. ते नंतर पाहिले जाईल. सध्या पक्षाने मला लोकसभेची निवडणूक लढायला सांगितले. लढत आहे.

### कपिल सिब्बल

## आमचे काम, आमची ताकद; आमच्याविरुद्ध अपप्रचार ही कमजोरी



**काँग्रेससाठी सर्वात अवघड निवडणूक आहे. भाजप व आम आदमी पार्टीदरम्यान तुम्ही अडकलात तर नाही ना?**
प्रत्येक निवडणूक ही एक आव्हानच असते. कोण फसले आहे ते लोकच सांगतील. मी एवढेच सांगेन, आमच्याविरुद्ध अपप्रचार केला जात आहे.

**केंद्र सरकारमध्ये तुम्ही ज्येष्ठ मंत्री आहात. सरकारवरील नाराजीचा थेट परिणाम तुमच्या निवडणुकीवर आहे?**
मी म्हटलो ना, अपप्रचार होत आहे. पूर्वी कधी झाले नाही, एवढे काम या सरकारने केले. मी माझ्या मतदारसंघातही पुष्कळ काम केले. स्वखर्चाने तेथे रुग्णवाहिका चालवतो. त्याचे अवडंबर करत नाही. ४० वर्षांपासून कब्रस्तान बनवण्याची मागणी होती. मी पूर्ण केली. पार्क, पार्किंग, पाण्याची गरज भागवली.

> जेव्हा लोक जेवणात दोन भाज्या खाऊ लागतात, तेव्हा महागाई वाढते.
> *२१ नोव्हेंबर २०१३ भोपाळ येथे..*

**तर मग लोकांच्या नाराजीचे कारण तरी काय आहे?**
काही नाराजी नाहीय. प्रसारमाध्यमे एकाच व्यक्तीला असे सादर करत आहेत जणू ती प्रत्येक समस्या सोडवेल. नरेंद्र मोदींच्या गुजरात मॉडेलची चर्चा होते. हे का नाही सांगितले जात की त्यांच्या मंत्र्यांविरोधात भ्रष्टाचाराचे खटले दाखल आहेत आणि ते सर्व सरकारमध्ये आहेत.

**सरकारच्या उणिवांचे खापर मीडियावर कशासाठी? तुम्ही योग्य पद्धतीने कम्युनिकेट करू नाही शकले?**
कम्युनिकेट केले नाही, असे नाही. परंतु, एकतर्फी प्रचार होत आहे. हे लोकशाहीसाठी बरे नाही.

**तुमची मजबूत आणि नकारात्मक बाजू कोणती आहे?**
आमचे बलस्थान आहे आमचे काम आणि नकारात्मक बाजू आहे आमच्या विरोधात होत असलेला अपप्रचार.

### आशुतोष

## जनतेने ठरवले, तर राजकीय दिग्गजांचे काही चालत नाही



**सर्व्हे सांगतात की, आम आदमी पार्टीत दिल्ली विधानसभेवेळचा विश्वास राहिला नाही. कसे जिंकणार?**
सर्वेक्षणाबद्दल काही दिवसांपूर्वी एका वृत्तवाहिनीने दाखवले. कशा पद्धतीने सर्वेक्षणात गोंधळ होतो, हे समोर आले आहे. आम आदमी पार्टीने देशाच्या लोकांना उमेद दिली आहे. लोकांना काँग्रेस-भाजप यांच्या साट्यालोट्याबद्दल लक्षात आले आहे.

**तुम्ही अत्यंत आक्रमक पत्रकार होतात. आता मात्र राजकारणातील दिग्गजांशी संघर्ष आहे, कसे जिंकणार?**
दिल्ली विधानसभेत आमच्या सहकाऱ्यांच्या विजयाने सिद्ध झाले की, राजकारणात दिग्गजांची काय स्थिती होऊ शकते. शीला दीक्षित तर निवडणूकदेखील हारल्या. आता जनतेला स्वच्छ चारित्र्याचे राजकीय नेतृत्व पाहिजे आहे.

> हा आहे मोदींचा जातीयवादी चेहरा. ते वाट्टेल ते बोलत सुटले आहेत..
> *२८ मार्च २०१४ नवी दिल्लीत..*

**नंबर एक राजकीय शत्रू कोण? लढाई भाजपशी की काँग्रेसशी ?**
आमची लढाई भ्रष्टाचाराशी आहे. कोणत्याही पक्षाशी नाही. ही एक चळवळ आहे.

**दिल्लीत संधी मिळाली, तेव्हा का नाही केले?**
आम्ही काही दिवसांच्या सरकारात जे केले ते पूर्वी कोणीच नाही केले. हे ककलोकांना माहीत आहे.

**तुम्ही या निवडणुकीत तुमचे बलस्थान आणि नकारात्मक स्थान कोणते मानता ?**
बलस्थान हे आहे की, आता लोक निगेटीव्ह मतदान नाही, पॉझीटिव्ह मतदान करतात. नकारात्मक बाजूही आहे की, व्यक्तिगत हल्ले होत आहेत. विशेषतः मोदींची भाषा. त्यांच्या प्रचाराची पद्धत योग्य नाही. ते केजरीवालांना पाकिस्तानचा एजंट म्हणतात.

**वेब कॉमिक**



## आयर्न-मॅन नगमा

मेरठमध्ये प्रचारकाळात काँग्रेस उमेदवार नगमा बरोबर गैरवर्तणूक झाली. त्यापासून वाचण्यासाठी असेही उपाय वेबपेजेसवर सुचविले जात आहेत.

**प्रचार रंग**

## काँग्रेसचे पांघरूण पण, कलमाडींचा अट्टाहास

काँग्रेस आपल्या पक्षातील कलंकशोभा असलेले नेते सुरेश कलमाडींना झाकून ठेवू पाहतंय. पुण्यात काँग्रेसचे विश्वजित कदम व वरिष्ठ नेते पतंगराव कदम यांनी सुद्धा कलमाडींची भेट घेतली आहे. त्यानंतर चर्चा आहे की, कलमाडींनी शांतता ठेवून पक्षाशी बांधिलकी राखली तर सीबीआय कचाट्यातून थोडीफार उसंत त्यांना मिळू शकेल. परंतु निवडणूक निकालापर्यंत गप्पच राहिलो अन् काँग्रेसी सरकार आले नाही तर काय? त्यामुळेच ते तातडीने आपली सुटका कशी होईल,यादृष्टीने अगदी विरोधकांशीही प्रयत्न व बोलणी करीत आहेत.



## काँग्रेस-भाजपचे संगनमत

भाजपने ठरवूनच टाकले आहे की, जोपर्यंत काँग्रेस वाराणसीमध्ये मोदींच्या विरोधात उमेदवार उभे करीत नाहीत, तोपर्यंत भाजप सुद्धा सोनिया गांधी व राजीव गांधी यांच्या विरोधात आपले उमेदवार घोषित करणार नाहीत. असे का तर भाजपात अजून विचारविनिमयच सुरू आहे. तथापि, मामला काही वेगळाच आहे. मोदी यांच्या विरोधात काँग्रेस तुल्यबळ उमेदवार उभा करते की सामान्य हे भाजप पाहू इच्छिते. जर मोदींच्या विरोधात सामान्य उमेदवार असला तर रायबरेली व अमेठीतून भाजप कोणाही तुल्यबळास मैदानात उतरविणार नाही.



**भास्कर विशेष** एडीआर-दक्ष सर्वे

**लोकसभेच्या ५२५ जागांवर अडीच लाख व्यक्तींचे मत या सर्वेक्षणात विचारात घेण्यात आले आहे. हे देशातील सर्वात मोठे सर्वेक्षण असल्याचा एडीएचा दावा आहे. प्रत्येक मतदारसंघात ५०० व्यक्तींना प्रश्न विचारण्यात आले. जाणून घेऊया, खासदारांच्या कामाबाबत राज्यनिहाय जनता किती समाधानी आहे ते-**

# ४० पैकी तीन खासदारांनाच सरासरीपेक्षा अधिक गुण

## सरासरी प्रदर्शन म्हणजे १० पैकी ६ किंवा जास्त गुण मिळविणाऱ्यांमधून चर्चित चेहरे गायब

सर्वात संवेदनशील मतदारसंघ असलेल्या सीवान येथील खासदारांचे काम सर्वात चांगले

## बिहार

**बिहार** मध्ये लोकसभेच्या ४० जागा आहेत. येथे निवडणुकीत हिंसा, तसेच पैसा व गुंडगिरीचे प्राबल्य दिसून येते. येथील मतदारसंघांपैकी सीवान येथील जागा सर्वात संवेदनशील मानली जाते. कारण, येथून चार वेळा निवडून जाणारे खासदार मोहम्मद शहाबुद्दीन यांच्यावर अनेक गुन्हे आहेत. सध्या ते तुरुंगात आहेत. २००९ मध्ये येथून ओमप्रकाश यादव खासदार बनले. त्यांनी शहाबुद्दीन यांच्या पत्नी हीना शाहब यांना हरविले. सुरुवातीला ते जेडीयूशी जोडलेले होते; पण त्यांनी विजय मात्र अपक्ष म्हणून मिळविला होता. आता ते भाजपात आहेत. खासदारांच्या चांगल्या कामकाजाचा विचार करता येथील काम बिहारमध्ये सरासरीपेक्षा अधिक चांगले राहिलेले दिसते. येथील लोकांनी खासदारांना १० पैकी ७.५६ गुण दिले आहेत. रोजगारासारख्या मुद्यावर त्यांना ८.२२ गुणदेखील दिले आहेत.

याचप्रकारे सर्वात कमी गुण मतदारांनी हाजीपूरला दिले आहेत. रामसुंदर दास येथील खासदार आहेत. बिहारच्या या माजी मुख्यमंत्र्यांनी एकेकाळी सर्वाधिक मतांनी विजयी होण्याचा विक्रम करणाऱ्या रामविलास पासवान यांना गेल्या वेळी पराभूत केले होते.

## का करतात मतदान?

- उमेदवार पाहून
- पक्षासाठी
- पंतप्रधानपदाचा उमेदवार पाहून
- जात/धर्माच्या नावावर
- निवडणुकीपूर्वी मिळणारी भेटवस्तू पाहून

एकंदरीत उमेदवार पाहूनच मतदान केले जाते

## गुन्हेगारांना का मते देतात मतदार?



- 67.63% मानतात उमेदवाराचे काम चांगले आहे
- 33.79% प्रकरणे गंभीर नाही मानत
- 32.53% निवडणुकीत खर्च करतो
- 29.85% मतदारांना माहीत नाही
- 28.63% प्रबळ उमेदवार
- 19.69% जात-धर्माच्या कारणामुळे

## मतदारांच्या अपेक्षा पूर्ण नाही करू शकले शत्रुघ्न



त्यांच्या मतदारांना अपेक्षा होती, की ते चांगले नेतृत्व करतील. मात्र, त्यांनी मतदारांची निराशा केली.

**रोजगारासाठी** 10 पैकी 5.06 गुण

**चांगल्या रस्त्यांसाठी** 5.20

**शत्रुघ्न सिन्हा,** पटना साहिब — मतदारांनी 5.13 गुणच दिले. त्यांना प्रत्येक मुद्यावर सरासरीपेक्षा कमीच गुण मिळाले.




## अपेक्षेपेक्षा चांगल्या ठरल्या लोकसभा सभापती मीरा कुमार



**रोजगारासाठी** 10 पैकी 6.64 गुण

**पेयजलासाठी** 4.81

मीरा कुमार यांना मतदारांनी सर्वच मुद्यांवर अधिक गुण दिले. पेयजलाच्या मुद्यावर मात्र त्या मागे पडल्या.

**मीरा कुमार,** सासाराम — मतदारांना वाटत होते, की सभापती झाल्यानंतर त्यांचे दुर्लक्ष होईल.




..पण त्यांना सरासरीहून जास्त 6.75 गुण मिळाले.

## काही अन्य खासदारांचे प्रदर्शन




| खासदार | मतदारसंघ, पक्ष | गुण |
|---|---|---|
| कीर्ती आजाद | दरभंगा, भाजप | 4.68 |
| हरी मांझी | गया, भाजप | 5.54 |
| रामसुंदर दास | हाजीपूर, जेडीयू | 3.79 |
| महाबली सिंह | काराकाट, जेडीयू | 4.22 |
| निखिल चौधरी | कटिहार, भाजप | 4.56 |
| रंजन प्रसाद यादव | पाटलीपुत्र, जेडीयू | 5.48 |
| दिनेश यादव | खगरिया, जेडीयू | 5.16 |
| हुकूमदेव नारायण | मधुबनी, भाजप | 6.25 |
| राजीव रंजन सिंह | मुंगेर, जेडीयू | 5.44 |
| कौशलेंद्र कुमार | नालंदा, जेडीयू | 5.08 |
| रघुवंश प्रसाद सिंह | वैशाली, राजद | 5.37 |

## जेडीयूच्या अध्यक्षांचे प्रदर्शनही मतदारांना नाही भावले



10 / 5.19

जेडीयूच्या अध्यक्षांचे प्रदर्शनही कमी पडले. त्यांच्या मधेपुरात त्यांना मतदारांनी १० पैकी फक्त ५.१९ गुणच दिले.

## शाहनवाज हुसेन अपेक्षेपेक्षा जवळपास तीन पटींनी मागे



10 / 3.98

ते चांगले काम करतील अशी लोकांना अपेक्षा होती. विविध मुद्यांवर त्यांना ३.९८ गुणच मिळाले. त्यांना कुठल्याही मुद्यावर ५ गुण मिळू शकले नाहीत.

या यादीत केवळ निवडक खासदारांची नावे सामील नाहीत.